## कोर्ट विद्यमान न्यायाधीश, सहकार न्यायालय, नांदेड

( श्री बी.एस.लखोटे न्यायाधीश यांचे समक्ष )

रामदास रोकडोजी माडेवार.

**विरूध्द**

गोदावरी हातमाग वस्त्रनिर्माण सहकारी संस्था
मर्या. वसरणी नांदेड ता. जि. नांदेड.

## निशानी ५ वर आदेश

१. वादी यांनी सदरचा अर्ज तात्पूरता मनाई हुकूम करिता दाखल केला असून वादीने विनंती केली आहे की प्रतिवादी संस्थेने सर्वे नं. ५० वसरणी ता. जि. नांदेड मधील सिडको रोडच्यालगत दोन्हीही बाजूने असलेली रिकामे प्लॅाट हे संस्थेच्या व्यापारी संकूलासाठी ठेवण्यात आली आहे. जे प्लॅाट नं. १४ ते १६ , ४५, ४५/१ व ४६ ते ६० कोणासही हस्तांतर करू नये. वादीचे कथन आहे की ते प्रतिवादी संस्थेचे सभासद असून संस्था गोदावरी हातमाग वस्त्रनिर्माण सह. संस्था मर्या. वसरणीचा उद्‌देश उपविधी प्रमाणे आहे. संस्थेने सभासदांना हातमाग वस्त्रोद्योग चालविण्यासाठी वसरणी येथे जमीन खरेदी करून प्लॅाटचे वितरण केले आहे.

२. संस्थेचे मूळ सभासद रामजी आलेवार यांना संस्थेने प्लॅाट क्र. ११० सर्वे नं. ३६ साईज ९ बाय १२ एकूण क्षेत्रफळ १०८ चौ.मी. प्लॅाट हस्तांतर केला होता. परंतू सदर सभासद यांनी हा प्लॅाट वादी यांना रीतसर हस्तांतर करण्यासाठी संस्थेकडे सभासद पदाचा राजीनामा तसेच भाग हस्तांतरण तसेच परिशिष्ट क्र. २० (१) संस्थेचे नावाने भाग हस्तांतर करणे बाबत संबंधीत कागदपत्रे वादीने व मूळ सभासदाने दाखल करून मूळ सभासद यांचा प्लॅाट वादीच्या नावे हस्तांतर करण्याची विनंती केली होती, परंतू संस्थेने सदरचा प्लॅाट वादीच्या नावे हस्तांतर न केल्यामूळे त्यांना सभासदत्व करून न घेतल्यामूळे वादी यांनी उपनिबंधक सह. संस्था नांदेड यांच्या कार्यालयात दि. १२.०३. २०१५ रोजी सभासद करणे व प्लॅाट हस्तांतर करणे संबंधी रीतसर अर्ज दाखल केला होता आणि संबंधित कार्यालयाने वादीचा अर्ज मंजूर करून सभासद म्हणून दि. १४.१०.२०१५ रोजी घोषित करण्यात आले त्यांनतर संस्थेने सदर आदेशाविरूध्द

पूनर्रनिरीक्षण अर्ज क्र. २५२/२०१५ अन्वये विभागिय सहनिबंधक सह. संस्था लातूर या कार्यालयात आवाहन दिले होते. परंतू संबंधित कार्यालयाने संस्थेचा पूनर्रनिरिक्षण अर्ज फेटाळण्यात आला. त्यामूळे वादी हे प्रतिवादी संस्थेचे सभासद आहे.

३. प्रतिवादी संस्थेने लवाद क्र. ४३/२०१७ वादी व मूळ सभासद यांच्या विरोधात दावा दाखल केला होता आणि सदरचा दावा दि. १५.०७.२०१९ रोजी फेटाळण्यात आला. वादी यांनी संस्थेच्या विरोधात वेळोवेळी प्रादेशिक उपायूक्त वस्त्रोद्योग औरंगाबाद तथा जिल्हाधिकारी नांदेड व इतर संबंधित कार्यालयाकडे लेखी तक्रार करूनही प्रतिवादी संस्थेने वादीला मूळ प्लॅाट धारकाच्या अनूषंगाने झालेल्या सभासदाचा लाभ म्हणजे प्लॅाटचे हस्तांतरण केले नाही.

४. संबंधीत कार्यालयाने वेळोवेळी प्रतिवादी संस्थेला वादी प्लॅाटचे हस्तातर करण्यासंबंधी आदेशीत केल्यानंतर प्रतिवादी संस्थेने वादी यांना मूळ सभासद व्यंकटी रामजी आलेवार यांचे सभासदत्व रद्द करून नियमाप्रमाणे सभासद करून घेतले तसेच वादी यांना भाग प्रमाणपत्र व संस्थेच्या नोंदणी पूस्तकामध्ये सभासद म्हणून नोंद घेतली आहे. परंतू मूळ सभासद यांचा प्लॅाट क्र. ११० चे हस्तांतर करण्यात आले नाही. अथवा संस्थेला सदर प्लॅाट क्र. ११० सर्वे नं. ३६ मधून अॅलोट करण्यास संस्थेला काही अडचण निर्माण झाली असल्यास संस्थेने वादी यांना संस्थेकडे शिल्लक असलेल्या शॉपिंग कॉम्प्लेक्स मधील प्लॅाट पैकी १ प्लॅाट देणे गरजेचे होते परंतू संस्थेने आजपर्यंत वादी यांना कोणताही प्लॅाट हस्तांतर केला नाही.

५. संस्थेने माजी व चालू संचालक मंडळातील पदाधिकारी यांनी त्यांच्या कुटूंबामध्ये एकापेक्षा अनेक प्लॅाट बेकायदेशीररीत्या नावाने घेवून संस्थेचे सभासद करून घेतले जे संस्थेच्या उपविधीमधील तरतूदीच्या विरोधात आहे आणि यासंबंधी वादी यांनी संबंधीत कार्यालयाकडे हरकत घेतली होती. संचालक मंडळाने प्लॅाट वाटप स्वत:च्या कुटूंबात करीत असताना संस्थेच्या उपविधीतील तरतूदीचे उल्लंघन केले आहे.

६. वादी यांनी संस्थेच्या संचालक विरोधात वेळोवेळी तक्रार केल्यामूळे

संचालक मंडळाने संस्थेचे वार्षिक साधारण सभा दि. २९.०९.२०२४ मध्ये ठराव क्र. ७ अन्वये वादी यांना कोणत्याही प्लॉटचे हस्तातर करायचे नाही असा ठराव पारित केला. प्रत्यक्षात असा ठराव पारित झाला नाही आणि संचालक मंडळाने सभा संपल्यानंतर संगनमत करून हा ठराव प्रोसिडिंग बूकावर नमूद केला.

७. संस्थेकडे आजही प्लॉट शिल्लक असल्यामूळे आणि वादी हे संस्थेचे सभासद असल्यामूळे त्यांना शिल्लक प्लॉट पैकी एका प्लॉटचे हस्तांतर करण्यात यावे आणि जोपर्यंत वादी यांना प्लॉटचे हस्तांतर करण्यात येत नाही तोपर्यंत संस्थेने शिल्लक प्लॉट इतरांना वाटप करण्यात येवू नये करिता वादीची विनंती.

८. संस्थेने वादीच्या अर्जाला नि. १६ कडे म्हणणे दाखल करून कथन केले आहे की भूमी अभिलेख नांदेड यांनी सर्वे नं. ३६ ची मोजणी केली आणि नकाशा संस्थेच्या नावे दि. ०३.०७.२००७ ला पाठविले त्यात नांदेड ते लातूर रोडच्या पलीकडे सर्वे नं. ३६ ची जमीन नसून या शेतजमीनीच्या उत्तरेकडील बाजूची जमीन आहे. नांदेड लातूर रस्त्याच्या पलीकडील असलेले भूखंड अभिन्यासा संस्थेच्या नावे दर्शविण्यात आलेला भूखंड क्र. १०९ ते ११४ सभासदांना वाटप केल्याचे दर्शविण्यात आले. भूमि अभिलेख कार्यालयाच्या मोजणीत भूखंड क्र. १०९ ते ११४ संस्थेच्या मालकीचे व ताब्यातील नसल्यामूळे संचालक मंडळाच्या सभेतील ठराव क्र. ४ दि. १९.०४.२०१३ नूसार ते भूखंड रद्द करण्यात आले आणि संबंधीत सभासदांना सर्वे नं. ३६ संबंधी न्यायप्रविष्ट असलेल्या प्रकरणाचा अंतिम निकाल लागल्यानंतर भूखंड देण्याचे ठरविण्यात आले.

९. सर्वे नं. ३६ क्षेत्र २.८८ हे. आर. मौजे वसरणीच्या लगतचे सर्वे नं.69/1 चे शेतमालक विनयाबाई नांदेडकर व इतर यांनी संस्थेच्या मालकीच्या आणि ताब्यातील जमिनी संबंधीतील वाद उपस्थित करून दिवाणी दावा क्र. 206/2007 ( जूना ) व दिवाणी दावा 130/2012 ( नवीन ) सह दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर नांदेड यांचे न्यायालयात दाखल केला असून त्यामध्ये न्यायालयाने संस्थेविरूध्द तातपूरत्या मनाई हुकूमाचा आदेश

पारित केल्यामूळे संस्थेला त्यासंबंधी निर्णय घेणे शक्य नाही. श्री. व्यंकटी रावजी आलेवार यांनी संस्थेची सहमती न घेता बिगर सभासद असलेले आणि समान उद्देश असलेल्या नांदेड हातमाग विणकर सहकारी संस्था दत्तनगरचा संस्थेचा व नांदेड जिल्हा यंत्रमाग असोशिएशन नांदेड या संस्थेचा सभासद व अध्यक्ष असल्यामूळे अर्जदार यांच्याशी संस्थेच्या परवानगी शिवाय सभासद करून घेणे बाबत प्लॉट हस्तातरचा व्यवहार केला आहे, तो संस्थेच्या पोटनियम क्र. ८ (ब) (१२) व १३ (अ) विरूध्द असल्यामूळे संस्थेनी अर्जदार यांना संस्थेचे सभासद करून घेतले नाही. त्यामूळे उपनिबंधक सहकारी संस्था नांदेड यांचे दि. १४.१०.२०१५ रोजीचे आदेशानूसार अर्जदाराला संस्थेचे सभासद घोषित केले. संस्थेने त्याविरूध्द अपील दाखल केले होते आणि ते अपील नामंजूर करण्यात आले. पण त्या आदेश क्र. ३ मध्ये सर्वे नं. ३६ मधील प्लॉट क्र. ११० बाबत दिवाणी न्यायालयाच्या निर्णयाच्या अधीन राहून संस्थेने अर्जदार यांना सभासदत्व देण्याचे आणि प्लॉट वाटपाची कारवाई करण्याचे आदेशात नमूद केले आहे. दिवाणी न्यायालयातील दावा क्र. २०६/२००७ (जूना) व आरसीएस नं. १३०/२०१२ (नवीन) मध्ये तात्पूरता मनाईहुकूम आजही असल्यामूळे व विभागीय सहनिबंधक सह. संस्था लातूर आणि दिवाणी दावा प्रलंबित असल्यामूळे संस्थेने मा. उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे याचिका क्र. ७६५२/२०१७ दाखल केलेल्या असल्यामूळे व दिवाणी दावा क्र. २०६/२००७ मध्ये मनाईहुकूम संस्थेच्या विरूध्द असल्यामूळे संस्थेनी वादी यांना सभासद करून घेतले नाही त्यामूळे वादीला कलम ९१ अंतर्गत दावा दाखल करण्याचा अधिकार नाही.

१०. वादी यांना व्यंकट आलेवार यांनी संस्थेचा प्लॉट क्र. ११० खरेदी विक्री करण्यापूर्वी संस्थेची पूर्वपरवानगी घेतली नाही त्यामूळे संस्थेने वादी यांच्या नावाने प्लॉट क्र. ११० हस्तातर करू नये अश्याप्रकारचा ठराव क्र. ७ दि. २९.०९.२०२४ रोजी पारित करण्यात आला व त्यासंबंधीचा दावा सीसीएन नं. ४३/२०१७ संस्थेने न्यायालयात दाखल केला होता आणि तो या न्यायालयाने फेटाळल्यामूळे त्याविरूध्द याचिका क्र. ९०५/२०२३ मा. उच्च न्यायालयात प्रलंबित असताना वादीचा अर्ज मंजूर करता येणार नाही. संस्थेच्या पूर्वपरवानगी शिवाय अर्जदाराच्या नावाने

संस्थेतील कोणताही प्लॉट हस्तांतर करता येणार नाही वादी यांना दावा दाखल करण्यास कोणतेही कारण घडले नाही. श्री व्यंकटी रामजी आलेवार यांनी वादी यांच्याशी प्लॉट क्र. ११० चा खरेदी विक्रीचा व्यवहार बेकायदेशीर आहे आणि त्यामूळे वादी यांना प्लॉट हस्तातरीत करता येणार नाही. संस्थेच्या दि. २९.०९.२०२४ च्या वार्षिक सभेतील ठराव क्र. ७ नूसार संस्थेकडे शिल्लक असलेल्या शॉपिंग कॉम्प्लेक्स मधील १ ही प्लॉट वादीला अथवा कोणत्याही सदस्यास खरेदी करता येणार नाही. अथवा संस्थेस इतरांना विक्री व हस्तांतर करता येणार नाही. त्यामूळे संस्थेनी संस्थेतील राखून ठेवलेल्या प्लॉट पैकी कोणताही प्लॉट वादीला देता येत नाही. संस्थेच्या पोटनियम क्र. १३ (अ) व पोटनियम क्र. ८ (ब) (१२) मधील तरतूदीप्रमाणे वादी हा संस्थेचा सभासद होण्यास व प्लॉट हस्तांतर करण्यास पात्र नाही. करिता वादीचा अर्ज नामंजूर करण्यात यावा.

११. वादी आणि प्रतिवादी यांच्या कथनावरून खालील मूद्दे उपस्थित होतात.

| **मूद्दा** | **निष्कर्ष** |
|---|---|
| १. तात्पूरत्या मनाई हुकूमाकरिता वादीची प्रथमदर्शनी केस आहे काय ? | नकारार्थी |
| २. वादीच्या बाजूने बॅलेन्स ऑफ कन्वेन्स आहे काय ? | नकारार्थी |
| ३. वादीचा अर्ज नामंजूर झाल्यास त्यांचे नूकसान होणार आहे काय ? | नकारार्थी |

**कारणमिमांसा**

१२. वादीच्या म्हणण्याप्रमाणे त्यांनी संस्थेचे मूळ सभासद श्री. रामजी आलेवार यांच्याकडून प्लॉट क्र. ११० सर्वे नं. ३६ मधील खरेदी केला परंतू संस्थेने वादी यांना सभासद करून घेतले नाही आणि त्याप्लॉटचे हस्तांतर करून दिले नाही. वादी यांना हस्तांतर करण्यासाठी मूळ सभासद यांनी त्यांचा पदावा राजीनामा आणि हस्तांतर करण्यासाठी कागदपत्रे संस्थेकडे दिली परंतू संस्थेने कोणतीही कारवाई केली नाही. त्यामूळे वादीची विनंती आहे की सर्वे नं. ५० मधील संस्थेने व्यापारी संकूलासाठी

राखून ठेवलेले प्लॉट्स कोणासही हस्तांतर करू नये. याविरूध्द संस्थेने नमूद केले आहे की संस्थेने दि. २९.०९.२०२४ च्या ठराव क्र. ७ नूसार प्लॉट शॉपिंग कॉम्प्लेक्स करिता राखीव ठेवून ते कोणत्याही सभासदास खरेदी करता येणार नाही. अथवा विक्री करता येणार नाही असा ठराव पारित केला त्यामूळे वादीला या राखीव प्लॉट पैकी प्लॉट देता येणार नाही.

१३. वादी आणि प्रतिवादी यांनी त्यांच्या कथनाच्या समर्थ कागदपत्रे दाखल केले वादीचे वकील श्री. वीर यांनी यूक्तीवाद केला आहे की विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था यांच्या आदेशाप्रमाणे वादी यांना प्लॉट क्र. ११० आणि सभासदत्व देण्याबाबत दिवाणी न्यायालयाच्या निर्णयाच्या अधीन राहून कारवाई करण्याचे आदेश दिले आणि त्याप्रमाणे संस्थेने वादी यांना सभासदत्व दिले, संस्थेने दि. २६.०६.२००४ रोजी ठराव पारित करून वादीला प्लॉट बदलून देण्यासंबंधी ठराव केला. पूढे यूक्तीवाद केला आहे की वादी यांनी त्यांच्या नावावर प्लॉट क्र. ११० हस्तांतर होण्याकरिता आणि संस्थेने त्यांना सभासदत्व करून घेण्याकरिता कागदपत्रे दाखल करून विनंती केली परंतू संस्थेने त्यावर कोणतीही कारवाई केली नाही. वादी यांना त्यांच्या नावे प्लॉटचे हस्तांतर होत नाही तोपर्यंत संस्थेकडे शॉपिंग कॉम्प्लेक्स करिता राखीव ठेवलेले प्लॉट हस्तांतर करू नये.

१४. याविरूध्द संस्थेचे वकील श्री. पवार यांनी यूक्तीवाद केला आहे की वादी यांना दावा दाखल करण्याचे कोणतेही कारण नाही, संस्थेविरूध्द सर्वे नं. ६९/१ चे मालक यांनी संस्थेविरूध्द दिवाणी दावा दाखल केला आहे आणि दिवाणी न्यायालयाने संस्थेविरूध्द तात्पूरता मनाईहुकूमाचा आदेश पारित केला आहे त्यामूळे संस्था प्लॉट क्र. ३६ वादीला हस्तांतर करू शकत नाही. संस्थेने वादी आणि मूळ सभासद रामजी आलेवार यांच्याविरूध्द दावा क्र. ४३/२०१७ दाखल केला होता आणि तो दावा न्यायालयाने फेटाळला परंतू त्याविरूध्द संस्थेने याचिका क्र. ९०५/२०२३ मा. उच्च न्यायालयात दाखल केला आहे. पूढे यूक्तीवाद केला आहे की वादी यांनी अर्जामध्ये नमूद केलेल्या प्लॉट व्यापारी संकूलमधील प्लॉटशी वादीचा संबध नाही.

सदरचे प्लॉट पूर्वपरवानगी न घेता विक्री करता येत नाही किवां हस्तातर करता येत नाही. वादी यांनी संस्थेने दि. २९.०९.२०२४ रोजी घेतलेल्या सभेमध्ये ठरावाला विरोध केला नाही. वादीच्या हक्कात प्रथमदर्शनी केस असल्याचे सिध्द होत नाही.

१५. वादी आणि प्रतिवादी यांच्या वकिलांच्या यूक्तीवादातील तथ्य तपासण्याकरिता तसेच वादी यांनी मागणी केलेल्या अर्जातील तात्पूरत्या मनाई हुकूमाच्या अनूषंगाने तथ्य तपासण्याकरिता वादी आणि प्रतिवादी यांनी दाखल केलेल्या कागदपत्राचे अवलोकन करणे आवश्यक आहे. प्रथमतः वादी यांनी तात्पुरता मनाई हुकूमाची मागणी केल्यामूळे त्यांच्याबाजूने प्रथमदर्शनी केस आहे हे दाखविण्याची जबाबदारी वादी यांची आहे. तसेच वादी यांच्या बाजूने मनाई हुकूम पारित न झाल्यास त्यांचे कोणते न भरून निघणारे नूकसान होणार आहे हेसूध्दा दाखविण्याची जबाबदारी त्यांची आहे. वादी आणि प्रतिवादी यांनी दाखल केलेल्या कागदपत्रावरून दिसून येते की वादी यांनी मूळ सभासद श्री. आलेवार यांच्याकडून सर्वे नं. ३६ मधील प्लॉट क्र. ११० खरेदीचा व्यवहार केला आणि त्या प्लॉटची नोंद वादी यांच्या नावे होण्याकरिता आणि संस्थेने त्यांना सभासद करून घेण्याकरिता कारवाई केल्याचे दिसून येते. परंतू संस्थेने वादी यांना सभासद करून न घेतल्यामूळे उपनिबंधक सहकारी संस्था नांदेड यांच्या आदेशान्वये वादी हे संस्थेचे सभासद असल्याचे घोषित केले तसेच विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था लातूर यांनीसूध्दा संस्थेने दाखल केलेल्या पुनर्रनिरीक्षण अर्जामध्ये आदेश पारित करून वादी यांना सभासदत्व देण्याची आणि प्लॉट वाटपाची कारवाई करावी असा सूध्दा उल्लेख आहे. तसेच वादी यांनी दाखल केलेल्या कागदपत्रावरून दिसून येते की संस्थेने वादी यांना भागप्रमाणपत्र देवून वादी यांच्या नावाची नोंद संस्थेच्या आय आणि जे रजिस्टर मध्ये सभासद म्हणून नोंद केली. परंतू संस्थेनी ही बाब नाकारली की वादी हे संस्थेचे सभासद नाही परंतू संस्थेनी दि. २९.०९.२०२४ च्या सभेतील ठराव क्र. ७ मध्ये वादी यांना सभासद करून घेतल्याची नोंद आहे. परंतू दिवाणी न्यायालयाचा निकाल लागेपर्यंत प्लॉट क्र. ३६ बाबत निर्णय घेणे योग्य नाही असे नमूद केले.

१६. वरील बाबीवरून स्पष्ट होते की वादी आज प्रतिवादी संस्थेचे सभासद

आहेत. परंतू संस्थेच्या म्हणण्याप्रमाणे संस्थेने विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था लातूर यांच्या आदेशाविरूध्द याचिका क्र. ७६५२/२०१७ दाखल केली आहे आणि दिवाणी दावा क्र. २१०/२००७ मध्ये संस्थेच्याविरूध्द मनाई हुकूम असल्यामूळे तसेच संस्थेच्या पोटनियमातील तरतूदीविरूध्द असल्यामूळे सभासद करून घेतले नाही. संस्थेच्या या कथनामध्ये तथ्यता दिसून येत नाही कारण वर उल्लेख केल्याप्रमाणे संस्थेने २९.०९. २०२४ रोजीच्या सभेमधील ठराव क्र. ७ अन्वये वादीला सभासद करून घेतले. प्रतिवादी संस्थेने मूद्दा उपस्थित केला आहे की सर्वे नं. ३६ लगतचे सर्वे नं. ६९/१ च्या मालकांनी संस्थेच्या जमिनीबाबत दिवाणी दावा दाखल केला आणि त्याविरूध्द तात्पुरता मनाई हुकूमाचा आदेश संस्थेविरूध्द पारित करण्यात आला. त्यामूळे प्लॅाट क्र. ११० संबंधी संस्थेला कारवाई करता येत नाही. वादीच्या कथनाप्रमाणे वादीचे म्हणणे आहे की सर्वे नं. ३६ मधील काही प्लॅाट इतर सभासदांना वाटप केले परंतू काही कारणास्तव त्या सभासदांना ते प्लॅाट रद्द करून परत सर्वे नं. ५० मधून प्लॅाट वाटप केले. ही बाब जरी खरी असली परंतू वादी हे सर्व नंबर ५० मधील व्यापारी संकूलकरिता राखीव ठेवण्यात आलेल्या प्लॅाट क्र. १४ ते १६, ४५ ४५/१ व ४६ ते ६० पैकी प्लॅाट मिळण्यास हक्कदार आहे काय हे दाखविणे आवश्यक आहे कारण वादींनी सदरचे प्लॅाट कोणासही हस्तांतर करू नये अशी विनंती केली आहे.

१७. संस्थेने दाखल केलेल्या सभेच्या इतीवृतीवरून दिसून येते की संस्थेने ठराव क्र. ७ सभा दि. २९.०९.२०२४ प्रमाणे सदरचे प्लॅाट्स कोणत्याही सभासदास हस्तांतर न करण्याचा ठराव पारित केला त्यामूळे ठरावाप्रमाणे संस्था कोणत्याही सभासदास सदरचे राखीव प्लॅाट हस्तांतर करू शकत नाही. तसेच याअनूषंगाने ही बाब लक्षात घेणे आवश्यक आहे की वादी यांचा या राखीव प्लॅाटशी संबंध आहे काय. वादी यांनी प्लॅाट क्र. ११० सर्वे नं. ३६ मध्ये असल्यामूळे आणि त्याबाबत दिवाणी दावा क्र. २०६/२००७ (जूना) व दिवाणी क्र. १३०/२०१२ (नविन) न्यायालयात प्रलंबित असल्यामूळे आणि त्यामध्ये संस्थेविरूध तात्पूरता मनाई हुकूमाचा आदेश पारित झाल्यामूळे संस्था याक्षणी प्लॅाट नं. ११० बाबत निर्णय घेवू शकत नाही हे दिसून येते. वादी आणि प्रतिवादी यांनी दावा क्र. ४३/२०१७ चा उल्लेख केला आणि वादीच्या

म्हणण्याप्रमाणे हा दावा संस्थेने वादी यांनी मूळ सभासदाविरूध्द दाखल केला होता आणि दाखल निकालाच्या प्रतिवरून दिसून येते की संस्थेचा दावा नामंजूर करण्यात आला. संस्थेची अपीलसूध्दा नामंजूर केल्याचे दिसून येते परंतू संस्थेने याविरूध्द याचिका क्र. ९०५/२०२३ मा. उच्च न्यायालयात दाखल केले आहे आणि ती प्रलंबित आहे. परंतू संस्थेने वर उल्लेख केल्याप्रमाणे वादी यांना सभासदत्व करून घेतले आहे. याक्षणी मूद्दा एवढाच आहे की वादी यांचा संस्थेने व्यापारी संकूलकरिता राखीव ठेवण्यात आलेले वर नमूद प्लॅाट्सशी संबंध आहे किंवा नाही. परंतू उपलब्ध कागदपत्रावरून स्पष्ट होते की वादी यांचा सदर राखीव प्लॅाटशी संबंध नाही. वादी यांचा केवळ त्यांनी खरेदी केलेला प्लॅाट क्र. ११० शी संबंधीत आहे. वादी यांना संस्थेने सर्वे नं. ३६ प्लॅाट क्र. ११० त्यांच्या नावाने अलॅाट न करण्याचे कारण संस्थेने नमूद केले आहे. वादी सदरचा प्लॅाट त्यांच्या नावे हस्तांतर करण्यास हक्कदार आहे किंवा नाही हा पूराव्याचा भाग आहे. परंतू केवळ संस्थेने प्लॅाट क्र. ११० संबंधी कारवाई केली नाही म्हणून सर्वे नं. ५० मधील वरील राखीव प्लॅाट कोणासही हस्तांतर करू नये अश्याप्रकारची मागणी करण्याचा अधिकार नाही तसेच संस्थेनेसूध्दा हे प्लॅाट्स हस्तांतर न करण्याचा ठरावसूध्दा पारित केलेला आहे त्यामूळे वादीने मागणी केलेल्या तात्पूरता मनाई हुकूमात तथ्यता नाही.

वरील कारणास्त ही बाब स्पष्ट होत आहे की वादीच्या बाजूने कोणतीही प्रथमदर्शनी केस नाही.

करिता खालील आदेश पारित करण्यात येत आहे.

## आदेश

१. वादीचा अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

२. खर्चाबाबत आदेश नाही.

स्थळ : नांदेड

दिनांक : १२/११/२०२५

न्यायाधीश
(श्री.बी.एस.लखोटे)
सहकार न्यायालय नांदेड